THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 14TH JUNE 1894.

*☞ Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८७९ पासून सन १८८६ पर्यंतचे दक्षिणेंतील शेतकऱ्यांस मदत करण्याविषयींचे आक्ट सुधारण्याकरितां मसुदा.

सन १८७९ पासून सन १८८६ पर्यंतचे दक्षिणेंतील शेतकऱ्यांस मदत करण्याविषयींचे आक्ट खालीं निर्दिष्ट केल्याप्रमाणें सुधारणें ज्या अर्थी इष्ट आहे, त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) ह्या आक्टास सन १८९४ चा दक्षिणेंतील शेतकऱ्यांस मदत करण्याविषयींचा आक्ट ह्मणावें, आणि ह्या आक्ट व सन १८७९ पासून सन १८८६ पर्यंतचे दक्षिणेंतील शेतकऱ्यांस मदत करण्याविषयींचे आक्ट ह्यांचा एकत्र उल्लेख करावयाचा असेल तेव्हां त्यांचा सन १८७९ पासून सन १८९४ पर्यंतचे दक्षिणेंतील शेतकऱ्यांस मदत करण्याविषयींचे आक्ट ह्या नांवानें उल्लेख करावा. सरनामा व सुरुवात.

(२) हा आक्ट तारीख १ माहे सन १८९ रोजीं अमलांत येईल.

२. ह्या आक्टांत, विषयास अगर संदर्भास बाध येण्यासारखें कांहीं एक नसेल तेव्हां.— व्याख्या.

"कलम" ह्मणजे सन १८७९ पासून सन १८८६ पर्यंतच्या दक्षिणेंतील शेतकऱ्यांस मदत करण्याविषयींचे आक्टांतलें कलम, आणि "बाब" ह्मणजे त्या आक्टांतली बाब असें समजावें—

३. कलमें ८, ९, १४, १५, १९ व ७३, आणि कलम ७ ह्यांतले शेवटचे अठरा शब्द ह्यावरून रद्द केले आहेत. रद्द करणें.

४. कलम १ ह्यांत, "जिल्ह्यास किंवा जिल्ह्यांस" ह्या शब्दांनंतर खालील मजकूर दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें :— कलम १ ह्यांत जास्त मजकूर दाखल करणें.

"किंवा अशा दुसऱ्या कोणत्याही जिल्ह्याच्या किंवा जिल्ह्याच्या कोणत्याही भागास किंवा भागांस".

५. कलम २ ह्याच्या ऐवजीं खालील कलम दाखल करावें: तें कलम येणेंप्रमाणें:— कलम २ ह्याच्या ऐवजीं नवीन कलम दाखल करणें.

अर्थ करणें.

"२. ह्या आक्टाचा अर्थ करितांना, विषयावरून अगर संदर्भावरून बाध येत नसेल तेव्हां, खालीं लिहिलेल्या नियमांप्रमाणें चाललें पाहिजेः ह्मणजे :—

"१ ला.—"शेतकरी" ह्या शब्दाचा अर्थ, जो कोणी मनुष्य आपण स्वतः किंवा आपल्या चाकरांच्या द्वारें किंवा जीं त्याचीं कुळें त्याच्या कुटुंबापैकीं असतील अशा कुळांच्या द्वारें, त्यावेळीं हा आक्ट ज्या जिल्ह्यास अगर जिल्ह्याच्या भागास लागू असेल, त्या जिल्ह्याच्या अगर भागाच्या हद्दींच्या आंत शेतकी चालवून आपली उपजीविका सर्वांशीं अगर पुष्कळ अंशांनीं मिळवितो, किंवा जो साधारणतः जातीनें सदहू हद्दींच्या आंत शेतकीचें काम करतो, तो मनुष्य, असा समजला पाहिजे.

"खुलासे.—(अ) ज्या शेतकऱ्यानें आपली शेतकऱ्याची स्थिति बदलण्याचा इरादा न बाळगतां आपली उपजीविका वर सांगितल्याप्रमाणें मिळविण्याचें किंवा शेतकीचें काम जातीनें करण्याचें कांहीं वेळपर्यंत बंद केलें असेल, तो, असें केल्यानें, ह्या व्याख्येप्रमाणें शेतकरी नाहींसा होत नाहीं.

"(ब) जो इनामदार आपल्या जमिनींची स्वतः लागवड करीत नसून ज्याला त्याच्या कुळांकडून येणाऱ्या खंडाच्या रूपानें उत्पन्न येत असतें, तो, आणि त्याच प्रमाणें सरकारी साऱ्याचा कोणताही असैनी किंवा कोणताही गहाण घेणारा, आपल्या त्या नात्यानें ह्या व्याख्येप्रमाणें शेतकरी होत नाहीं.

"२ रा.—वाबी २, ३, ४ व ६ ह्यांत आणि कलम ६९ ह्यांत, "शेतकरी" ह्या शब्दाचा उपयोग कोणत्याही दाव्याच्या किंवा कामाच्या संबंधानें केला असेल तेव्हां, त्याचा अर्थ, जो मनुष्य, त्या दाव्याचा किंवा कामाचा विषय असणारी जी पात्रता तिचा कोणताही भाग प्राप्त झाला तेव्हां त्यावेळीं अमलांत असलेल्या पहिल्या नियमांत व्याख्या केल्याप्रमाणें शेतकरी होता तो मनुष्य, असा समजला पाहिजे.

"३ रा.—शेतकरी वर सांगितल्याप्रमाणें जेथें आपली उपजीविका मिळवीत असेल किंवा जातीनें शेतकीचें काम करीत असेल, तेथें तो राहातो असें समजलें पाहिजे.

"४ था.—"पैका" ह्या शब्दांत, धान्य वगैरे शेतकीसंबंधी उत्पन्न, अउतें व गुरें-ढोरें ह्यांचा समावेश होतो असें समजलें पाहिजे.

"५ वा.—"पट्टा" ह्या शब्दांत उलट लेख, कबुलायत, लागवड किंवा भोगवटा करण्याचा करार, आणि पट्टयानें देण्याची कबुलायत, ह्यांचा समावेश होतो असें समजलें पाहिजे.

"६ वा.—"उभी पिकें" ह्या सर्वांत झाडांस किंवा जमिनीस जडलेल्या बागायती उत्पन्नाचा समावेश होतो असें समजलें पाहिजे."

कलम १३ ह्यानंतर एक नवीन कलम जास्त दाखल करणें.

६. कलम १३ ह्यानंतर खालील कलम जास्त दाखल करावें: तें कलम येणें-प्रमाणें:—

व्याज व साऱ्याचा खर्च ह्यांच्या मोबदला उत्पन्न घेण्याबद्दलचे विवक्षित करार मंजूर करणें.

१३ अ. (१) गेल्या शेवटल्या कलमांत कोणताही ठराव असला तथापि, [गहाण ठेविलेल्या मालमिळकतीचें] उत्पन्न, हिशोब नकरितां, व्याजाच्या, व साऱ्याच्या व त्या सारख्या खर्चाच्या मोबदला धरण्याविषयींचा तारीख पहिली माहे सन १८९ ह्या नंतर केलेला कोणताही करार, खतांत जी मुदल रकम मोबदला ह्मणून नमूद केलेली आहे तिच्या बद्दलच तें खत करून दिलेलें होतें अशी, आणि ती रकम रिणकोस अगर त्याच्या हुकुमाअन्वयें खरोखर दिली होती अशी, आणि ती मालमिळकत गहाण घेणाराच्या कबजांत खरोखर दिलेली असून तिची लागवड तो स्वतः अगर गहाण

देणारा व्यतिरिक्त इतर कुळाकडून करीत आहे अशी कोर्टाची खात्री होईल त्या बाबतींत, रद्द करूं नये.

"(२) पोटकलम (१) ह्यांत सांगितलेल्या प्रकारचा कोणताही करार मंजूर करण्यांत येईल त्या प्रसंगीं, त्या दाव्यांत हिशोब घेण्यांत आल्यास, तो गेल्या शेवटल्या कलमांत फर्माविल्याप्रमाणें परंतु त्या करारास पात्र समजून घ्यावा."

७. कलम १९ ढ, पोटकलम (३) ह्यांत खालील मजकूर दाखल करावाः तो मजकूर येणेंप्रमाणें:— कलम १५ ढ (३) ह्यांत जास्त मजकूर दाखल करणें.

"कोणतेंही गहाण सोडविण्याबद्दलच्या अगर कोणतेंही गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करण्याबद्दलच्या दरेक हुकुमनाम्यांत, किंवा मालमिळकत गहाण घेणारानें दावा आणिल्यावरून तिची विकरी करण्याबद्दल केलेल्या दरेक हुकुमनाम्यांत, गहाण देणारा त्या हुकुमनान्याअन्वयें जो पैका देण्यास पात्र असेल तो पैका त्यानें केव्हां दिला पाहिजे तो कोर्टास वाजवी वाटेल असा दिवस, नमूद केला पाहिजे; मात्र, तो दिवस त्या हुकुमनाम्याच्या तारिखेनंतरच्या तीन महिन्यांच्या आंतला नसला पाहिजे, आणि गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करण्याबद्दलचा सदर्हू प्रकारचा कोणताही हुकुम सदर्हूप्रमाणें नमूद केलेल्या दिवसाच्या आधीं पक्का करतां कामानये, आणि सदर्हूप्रकारची कोणतीही विक्री अशा दिवसाच्या आधीं अमलांत आणूं नये."

८. कलम ६१ ह्यांतील पहिल्या पांच शब्दांच्या ऐवजीं खालील शब्द दाखल करावेः ते शब्द येणेंप्रमाणें:— कलम ६१ याची सुधारणा.

"स्थानिक सरकार कोणत्याही अमलदारास नेमील त्यानें".

९. बाब ११ वी हींत, कलम ७० ह्याच्या आधीं, खालील कलमें दाखल करावीं: तीं कलमें येणेंप्रमाणें:— बाब ११ वी हींत दोन कलमें दाखल करणें.

"६९. अ. दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा ह्याच्या २५८व्या कलमाची शेवटची रकम, ह्या आक्टाअन्वयें चालविलेल्या कोणत्याही कामांत कोर्टाबाहेर केलेल्या कोणत्याही भरण्यास लागू होणार नाहीं. सन १८८२चा आक्ट १४वा, कलम २५८, लागू नाहीं.

"६९. ब. ह्या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याही दाव्यांत हिशोब घेतांना खालीं नमूद केलेल्या दरांनीं व्याज देवविलें पाहिजे:— हिशोब घेतांना व्याजाचा कोणता दर धरण्यास हरकत नाहीं तें.

(अ) उभयपक्षकारांच्या अथवा ज्या मनुष्यांच्या द्वारें ते दावा करितात अशीं कांहीं मनुष्यें असल्यास त्यांच्या दरमियान एकादा दर ठरलेला असल्यास आणि तो कोर्टाला गैरवाजवी वाटत नसल्यास, तो दर; अगर

(ब) सदरील दर कोर्टाला गैरवाजवी वाटल्यास, किंवा कोणताही दर ठरलेला नसल्यास, किंवा पक्षकारांच्या अथवा ज्या मनुष्यांच्या द्वारें ते दावा करितात अशा मनुष्यांच्या दरमियान, मालमिळकतीचें उत्पन्न हिशोब न करितां व्याजाच्या आणि सान्याच्या आणि त्यासारख्या खर्चाच्या मोबदला धरण्याविषयीं झालेला कोणताही करार कोर्टानें रद्द केलेला असल्यास, कोर्टाला वाजवी वाटेल तो दर."

१०. कलम ७२ ह्यांत, दुसऱ्या ओळींत आलेल्या "शेतकऱ्याविरुद्ध" ह्या शब्दांच्या आधीं, "पुणें, सातारा, सोलापूर व अहमदनगर ह्यांपैकीं कोणत्याही जिल्ह्यांतल्या" हे शब्द जास्त दाखल करावे; कलम ७२ याची सुधारणा.

आणि त्याच कलमाच्या विशेष ठरावांत (१) रकमेंत "शेतकरी" शब्द आला आहे त्याच्या आधीं "सदरीं सांगितलेल्या कोणत्याही जिल्ह्यांतला" हे शब्द जास्त दाखल करावे.

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

दक्षिणेंतील शेतकऱ्यांस मदत करण्याविषयींचे आक्ट ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या कायद्यामध्यें, त्या आक्टांचा अमल कसा झाला आहे त्याबद्दल चौकशी करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारानें सन १८९१ मध्यें नेमिलेल्या कमिशनाकडून सुचविण्यांत आलेले थोडेसे फेरफार सामील करण्यासाठीं हा लहानसा मसुदा तयार केला आहे. त्या कमिशनानें कांहीं मोठ्या प्रकरणांसंबंधानें ज्या कांहीं सूचना केलेल्या आहेत, त्यांचा, एक बाबत खेरीज करून (ह्या बाबतीचा उल्लेख लवकरच करण्यांत येईल) ह्या मसुद्याशीं बिलकुल संबंध नाहीं; एक विवक्षित कारण उत्पन्न झालें नसतें तर, मुंबई सरकार, हा कायदा हल्लींच्या स्थितींतच राहूं देऊन सदरील सर्व आक्ट एकत्र करण्याची वेळ येईपर्यंत प्रस्तुत सुचविलेले फेरफार तहकूब ठेवण्यास तयार होतें. मुंबई सरकार मुख्यत्वेंकरून ज्या कारणावरून प्रस्तुत हा मसुदा मंजूर करण्याबद्दल विनंति करीत आहे, तें कारण ह्या मसुद्याच्या ४ थ्या कलमावरून समजेल. हल्लीं अमलांत असलेल्या कायद्याअन्वयें सदरहू आक्ट इतर कोणत्याही जिल्ह्यास लागू करण्याची परवानगी आहे, परंतु एकाच जिल्ह्यांतल्या निरनिराळ्या तालुक्यांची स्वाभाविक व शेतकीसंबंधाची स्थिति फारच भिन्न भिन्न असते आणि आजपर्यंत चालू असलेल्या पद्धतीस अनुसरून मुंबई सरकारची अशी इच्छा असते कीं, सदरहू आक्ट ज्या प्रदेशांत खरोखर जरूरीचे असतील त्यांस मात्र ते लागू करावे. ह्या दिशेनें कायद्याची सुधारणा करण्याकरितां एक निराळा आक्ट करणें जरूर असल्यामुळें ही संधी साधून, कमिशनच्या कांहीं सूचना अमलांत आणण्याकरितां प्रस्तुत कायद्याचीं ८, ९, १९, १९ व ७३ हीं कलमें रद्द केलीं आहेत. हल्लीं अमलांत असलेल्या कायद्याचें १४ वें कलम रद्द करून तें बाब ११ हींत, कलम ६९ ह्याच्या खालीं, कलम ६९ ब ह्मणून दाखल केलें आहे; असें केल्यानें त्या कलमाची व्याप्ति जास्त विस्तृत झाली आहे. ह्या मसुद्याच्या ९ व्या कलमांत, "शेतकरी" ह्या शब्दाच्या व्याख्येंत किंचित बदल केला आहे; दुसऱ्या नियमाचा अर्थ जास्त स्पष्ट करण्यासाठीं आणि इनाम जमिनीच्या ज्या मालकास, तो सदरहू आक्ट लागू असलेल्या एकाद्या जिल्ह्यांतील कुळांकडून खंड घेत असतो, एवढ्याच कारणांवरून त्या जिल्ह्यांतला शेतकरी ह्मणवून घेण्याचा हक्क प्राप्त होत आहे, त्या मालकाला, शेतकरी लोकांसाठीं मुद्दाम केलेल्या कायद्यांतून वगळण्यासाठीं, सदरहू फेरफार केला आहे. कलम ६ हें कमिशनच्या इच्छेवरून दाखल केलें आहे, आणि अगदीं आवश्यक वाटल्या तेवढ्या मात्र अटी त्यास जोडल्या आहेत. कलम ७ ह्यांत, गहाण देणारास विवक्षित बाबतींत हुकूमनाम्यांत ठरविलेला पैका मिळविण्यास जी मुदत अगदीं उघडपणें आवश्यक आहे, ती देण्याबद्दल ठराव आहे. आणि कलम ९ ह्यांत, कलम ६९ अ कलमामध्यें, दक्षिणेंत प्रचारांत असलेली वहिवाट कायदेशीर ठरविली आहे. कलम १० अन्वयें, सदरहू आक्ट हल्लीं ज्या चार जिल्ह्यांत अमलांत आहे, त्यांसच हल्लींच्या आक्टांतला मुदतीसंबंधाचा विशेष ठराव लागू असावा, असें ठरविण्याचा विचार आहे, आणि अशा रीतीनें, कमिशनानें मुदतीसंबंधाच्या साधारण कायद्यांत फेरफार करावा अशी जी सूचना केली होती, ती अमलांत आणण्याचा विचार आहे. इतर फेरफारांसंबंधानें विशेष असें कांहीं एक सांगावयाची जरूरी नाहीं.

(सही) डब्ल्यू. लीवार्नर.

तारीख २८ माहे मार्च सन १८९४.

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.